जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट ३६६ - २३ दिनांक : - १८/१०/२०२३

## फेसबुकवरुन ओळख करुन लग्नाचे आमिष दाखवून जबरी संभोग करणा-या आरोपीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून अटक.

जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर येथे दिनांक १२.०९.२०२३ रोजी पिडीत महिलेने आरोपी नामे आशिष शुक्ला याचेविरुध्द फेसबुक अकाउंटद्वारे ओळख करुन लग्नाचे आमिष दाखवुन जुलै २०२२ ते सप्टेंबर २०२३ या काळात जबरी संभोग केला व जिवे ठार मारण्याची धमकी दिली आहे वगैरे मजकुरीचे फिर्यादीवरुन जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर गुन्हा रजि. नं. ५९९/२०२३ भादवि कलम ३७६ (२) (एन), ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर हे करीत होते. सदर गुन्हयात आरोपीचे पुर्ण नांव, पत्ता निष्पन्न नसल्याने तो गुन्हा घडलेपासुन आरोपी मिळुन येत नव्हता तसेच आरोपीची तांत्रीक विष्लेशना वरुन माहीती घेतली असता तो वेळोवेळी आपला ठावठिकाणा बदलुन वावरत होता.

सदर गुन्हयातील आरोपी हा मिरा-भाईदर येथे राहत असल्याची माहीती मिळाली असता आरोपीचे शोध घेणेकामी जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर येथील पोलीस निरीक्षक प्रमोद कांबळे व त्यांचे स्टाफ यांनी मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण शाखेस संपर्क केला असता पोलीस निरीक्षक, राहुल राख यांनी सपोनि. नितीन बेंद्रे व स्टाफ यांना सुचना दिल्याने तांत्रीक विष्लेशनाचे आधारे आरोपी आशिष रामचंद्र शुक्ला वय-३४ वर्षे रा. ८२/१/३, असल्फा सुंदरबाग, रसुल गुलाम चाळ, घाटकोपर पश्चिम मुंबई हा काशिमीरा पोलीस ठाण्याचे हद्दीत हाटकेश येथे मिळुन आल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेवुन पुढील कारवाई करणेकामी जुहु पोलीस स्टेशन, मुंबई शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे मा.सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, सपोनिरी. नितीन बेंद्रे, सपोउपनिरी. श्रीमंत जेधे, पो.हवा.प्रविणराज पवार, पोहवा.अनिल नांगरे, सपोउपनि संतोष चव्हाण यांनी केलेली आहे.